RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३३

दि. २३ मे २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी पोटनिवडणूक जाहीर केली. येत्या १८ जून २०२६ रोजी या एका जागेसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणी करून निकाल घोषित केला जाईल. महाराष्ट्रासोबतच तामिळनाडूतील सी. व्ही. शन्मुगम यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठीही याच दिवशी निवडणूक होणार आहे.

सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभा पोटनिवडणूक जिंकल्यानंतर ६ मे २०२६ रोजी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यांचा हा कार्यकाळ ४ जुलै २०२८ पर्यंत होता. या जागी आता ज्येष्ठ नेते आणि राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ राज्यसभेवर जातील, असा कयास बांधला जात आहे. शिवाय सुनेत्रा पवार यांचे दुसरे सुपुत्र जय पवार यांचेही नाव चर्चेत आहे.

विशेष म्हणजे याच दिवशी १८ जून रोजी विधानपरिषदेच्या १६ रिक्त जागांसाठी आणि नागपूर पोटनिवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

निवडणूक कार्यक्रम असा

निवडणूक अधिसूचना जारी होणार : १ जून २०२६

नामांकन अंतिम तारीख : ८ जून २०२६

उमेदवारी अर्जांची छाननी : ९ जून २०२६

अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत : ११ जून २०२६

मतदानाचा दिनांक आणि वेळ : १८ जून २०२६ (सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत)

मतमोजणी : १८ जून २०२६ (सायंकाळी ५:०० वाजता)

## कॉकरोच उल्लेखानंतर नवा वाद; जेन झी पिढीचा डिजिटल आवाज दडपण्याचा वडेट्टीवारांचा आरोप

**नागपूर/प्रतिनिधी :** बेरोजगारी, महागाई आणि भविष्याच्या असुरक्षिततेमुळे संतप्त झालेल्या 'जेन झी' पिढीचा आवाज दडपण्यासाठी सरकार समाजमाध्यमांवरील हँडल्स बंद करण्याचा मार्ग अवलंबत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

रोजगाराच्या प्रश्नांवरून सरकारवर टीका

वडेट्टीवार यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. आजच्या तरुणांसमोर रोजगार, शिक्षण आणि आर्थिक स्थैर्य ही मोठी आव्हाने उभी असताना सरकार मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणांना हिंदू-मुस्लिम किंवा भारत-पाकिस्तानसारख्या भावनिक मुद्द्यांमध्ये अडकवले जात आहे. मात्र, जेन झी पिढीला धार्मिक ध्रुवीकरण नको असून रोजगार आणि सुरक्षित भविष्य हवे आहे, असे ते म्हणाले.

'कॉकरोच' उल्लेखावरून संताप

देशातील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीकडून तरुणांना 'कॉकरोच' संबोधल्याचा आरोप करत वडेट्टीवार यांनी सरकारच्या भाषाशैलीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तरुणांविषयी अपमानास्पद भाषा वापरली जाते, तेव्हा त्यांच्या मनातील संताप उफाळून येणे स्वाभाविक आहे. सरकारची भाषा आणि वर्तन लोकशाहीला घातक ठरत आहे, अशी टीका त्यांनी केली. सरकारविरोधात मत व्यक्त करणाऱ्या तरुणांचे 'एक्स'वरील हँडल्स बंद करण्यात येत असल्याचाही आरोप त्यांनी केला.

राज्यातील विविध भरती प्रक्रिया आणि स्पर्धा परीक्षा रखडल्यामुळे युवकांमध्ये नैराश्य वाढत असल्याचा मुद्दाही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. तरुणांच्या भविष्याशी खेळण्याचे काम सुरू आहे. रोजगार निर्मितीबाबत दिलेली आश्वासने पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे सरकारवरील तरुणांचा विश्वास कमी होत आहे, असे त्यांनी नमूद केले. 'जेन झी' पिढी आता प्रश्न विचारत असून अन्यायाविरोधात स्पष्ट भूमिका घेत असल्यामुळे सरकार अस्वस्थ झाल्याचा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, सरन्यायाधीशांच्या कथित 'कॉकरोच' उल्लेखानंतर समाजमाध्यमांवर 'कॉकरोच जनता पार्टी' या नावाने डिजिटल मोहीम सुरू करण्यात आली आहे. विविध तरुण, विद्यार्थी आणि समाजमाध्यम वापरकर्त्यांनी उपरोधिक पोस्ट, मीम्स आणि व्हिडीओच्या माध्यमातून या वक्तव्याचा समाचार घेतला. काहींनी अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर दबाव वाढत असल्याचा आरोप केला, तर काहींनी सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे म्हटले.

'कॉकरोच जनता पार्टी' ही कोणतीही अधिकृत राजकीय संघटना नसून समाजमाध्यमांवरील प्रतीकात्मक मोहीम असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, या मोहिमेमुळे 'जेन झी' पिढीतील असंतोष, बेरोजगारी आणि व्यवस्थेविरोधातील भावना पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. काही कायदेतज्ज्ञांनी न्यायसंस्थेबाबत भाष्य करताना घटनात्मक मर्यादा राखण्याची गरज व्यक्त केली असली, तरी तरुणांमधील वाढता डिजिटल विरोध ही गंभीर सामाजिक आणि राजकीय घडामोड असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# विधान परिषदेच्या जागावाटपावरून महायुतीत पेच

## शिवसेनेचा ७ जागांवर ठाम दावा, भाजपकडून केवळ ३ ते ४ जागा सोडण्याची तयारी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होऊ घातलेल्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर, सत्ताधारी महायुतीमध्ये जागावाटपाचा मोठा पेच निर्माण झाल्याचे चित्र सध्या समोर येत आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने या निवडणुकीत तब्बल ७ जागांवर आपला ठाम दावा सांगितला आहे. ज्यामध्ये आधीच्या ५ जागा आणि नव्याने वाढलेल्या ताकदीच्या आधारावर अतिरिक्त २ जागा, अशा एकूण ७ जागांचा अधिकृत प्रस्ताव त्यांनी भाजपसमोर ठेवल्याची माहिती समोर आली आहे.

मात्र, शिवसेनेच्या या प्रस्तावाला भाजपकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. समोर आलेल्या माहितीनुसार, भाजप शिवसेनेला केवळ ३ ते ४ जागा सोडण्याच्या तयारीत आहे. असे असले तरी, शिवसेना आपल्या ७ जागांच्या मागणीवर ठाम राहिल्याने जागावाटपाचा हा तिढा आणखी वाढला असून, शिवसेनेने घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे महायुतीत जागावाटपावरून भाजपचीच कोंडी झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

या सर्व राजकीय घडामोडींच्या पार्श्र्वभूमीवर शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेत पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली. विधानपरिषदेच्या उमेदवारीबाबतचा अंतिम निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच घेतील, असे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, यापूर्वी धुळे आणि कोकण पट्ट्यात आमचे ५ आमदार होते आणि आता पक्षाची ताकद अधिक वाढल्यामुळेच आम्ही ७ जागांची रास्त मागणी केली असून, याबाबत महायुतीचे सर्व प्रमुख नेते एकत्र बसून अंतिम निर्णय घेतील.

शिवसेनेच्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभा, विधानसभा आणि आगामी महापालिका निवडणुकांच्या जागावाटपात पक्षाची ताकद अधिक असूनही



नेहमीच कमी जागांवर तडजोड करावी लागल्याची सल नेते आणि कार्यकर्त्यांच्या मनात आजही कायम असल्याने, आता कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याचा निर्णय पक्षाने घेतला असून, आगामी विधान परिषद निवडणुकीत पुन्हा तीच तडजोड खपवून घेतली जाणार नाही, अशी अत्यंत आक्रमक भूमिका शिवसेनेने घेतली आहे.

विधान परिषदेच्या जागांसाठी महायुतीमध्ये सुरुवातीला ठरलेल्या प्राथमिक फॉर्म्युल्यानुसार भाजप १२, शिवसेना ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार असल्याची चर्चा होती. महायुती म्हणून एकत्र लढण्यावर तिन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांचे एकमत होऊन काही पारंपरिक जागांची अदलाबदल केली जाणार असल्याचेही निश्र्चित झाले होते, मात्र आता शिवसेनेने थेट ७ जागांची मागणी केल्यामुळे या जागावाटपाच्या तिढ्यात नेमकं कोण माघार घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## मुंबईतील मेट्रोच्या ॲक्वा लाईनवर तांत्रिक बिघाड; दोनदा खोळंबली, प्रवाशांना मोठा मनस्ताप

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई मेट्रोच्या ॲक्वा लाईन ३ वर शुक्रवारी (दि.२२) तांत्रिक बिघाड झाला. या तांत्रिक बिघाडामुळे आज दोनदा मेट्रो सेवा खोळंबली. त्यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. ऑफिसला जाणाऱ्या हजारो प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. दरम्यान, सकाळी तांत्रिक बिघाड झाल्यामुळं काही काळ मेट्रो सेवा बंद झाली. त्यानंतर ही सेवा पुन्हा सुरू झाली. मात्र, दुपारी पुन्हा एकदा मेट्रोच्या ॲक्वा लाईन ३ वर तांत्रिक बिघाड झाला. हा तांत्रिक बिघाड जवळपास तासाभराने दुरुस्त करण्यात आला.

याबाबत मेट्रो प्रशासनातर्फे सांगण्यात आलं की, शुक्रवारी दुपारी आरएजेव्हीएलआर ते बीकेसी दरम्यान सेवा कोणत्याही अडचणीशिवाय सुरू आहे. मात्र, बीकेसी ते कफ परेड दरम्यान तांत्रिक बिघाड झाला होता. मुख्य सिग्नल यंत्रणेमध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडामुळं ही परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळं मेट्रोच्या ॲक्वा लाईन ३ वरील मेट्रो सेवेवर परिणाम झाला.

# अनाधिकृत पाणी चोरी करणाऱ्या नगरसेवका विरोधात कार्यवाही करा

## मनपा आयुक्तांकडे प्रभाग १६ मधील नागरिकांची तक्रार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहराची पाणी टंचाई सर्वज्ञात असून सर्वसामान्य नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकने नित्याचे झाले आहे. एकीकडे सर्वसामान्य लातूरकर पाणी टंचाईला तोंड देत असताना नगरसेवकांच्या घरात २ अनाधिकृत नळ आढळून आलेले आहेत. याप्रक्रणी मनपाने पंचनामाही केलेला असुन नगरसेविकेला नोटीस बजावण्यात आलेली आहे. मात्र केवळ नोटीस न बजावता त्या नगरसेविके विरोधात कार्यवाही करुन त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी प्रभाग १६ मधील नागरिकांनी निवेदनाच्या माध्यमातून मनपा आयुक्त, मानसी मीना यांना दिले आहे. लातूर शहराला पाणी टंचाई नवीन नाही. पाण्यासाठी वणवण भटकणे लातूरकरांना नित्याचे झालेले असुन धरणात पाणी असून ही





नागरिकांना पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ येत आहे. एकीकडे सर्वसामान्य नागरिक पाणी टंचाईने त्रस्त झालेला असताना मनपा लोकप्रतिनिधीच्याच घरात पाणी पुरवठा करणाऱ्या तीन नळ जोडण्या आढळून आलेल्या आहेत. यार्पकी दोन नळ जोडण्या अनाधिकृत असल्याची तक्रार यापूर्वी प्रभाग १६ च्या नागरिकांनी दिलेली होती. तक्रारदारांनी दिलेल्या तक्रानी नुसार मनपा प्रशासनाने प्रभाग १६ च्या नगरसेविका राजेश्री धोत्रे व त्यांची पती अंकीत बाहेती यांच्या घरी जावून मनपा प्रशासनाने याबाबत पंचनामा केला. या पंच नाम्यात ३ पैकी एक नळ रुक्मिणी तुकाराम धोत्रे यांच्या नावे असून इतर २ नळ अनाधिकृत असल्याचे किंवा याबाबत मनपा दप्तरी कोणतीच नोंद आढळून आली नाही. याप्रक्रणी मनपा प्रशासनाने नगरसेविका राजेश्री धोत्रे (बाहेती) व अंकित बाहेती यांना नोटीस बजावून अनाधिकृत नळ जोडण्या अधिकृत करुन घ्याव्यात अशी नोटीस बजावली आहे. मात्र प्रभाग १६ मधील नागरिकांनी नगरसेविका राजेश्री धोत्रे (बाहेती) व अंकित बाहेती यांच्या विरोधात गुन्हा नोंद करुन दोन्ही अनाधिकृत नळ सिल करण्यात यावेत तसेच त्यांच्याकडून अनाधिकृत पाणी वापराची थकबाकी व व्याजसह दंड वसुल करावा अशी मागणी मनपा आयुक्त मानसी मीना यांच्याकडे केली आहे. याप्रकरणी कार्यवाही न झाल्यास बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा ही दिलेला आहे. या निवेदनावर मनोज अभंगे, संजय आयाचित, प्रशांत गवंडगावे, विनोद वाकडे, शिवशंकर कावळे, सुभाष वर्मा, विनोद माटेफळकर, गुंडेराव डेंगळे, शिवप्रसाद मालू, पंडीत येलाले, चंद्रकांत सुर्यवंशी, एस. एस. वर्मा आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## राज्यसभेच्या २४ जागांसाठी निवडणुकांच्या तारखा जाहीर

नवी दिल्ली : १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणुका होणार आहेत. निवडणूक आयोगानं आज शुक्रवारी (२२ मे) या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, या १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठीच्या निवडणुका १८ जून २०२६ रोजी पार पडतील. निवडणूक आयोगाच्या या घोषणेनंतर, संबंधित राज्यांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे.

ज्या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत, त्यामध्ये आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, झारखंड, राजस्थान, कर्नाटक, मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोरम यांचा समावेश आहे. आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये सर्वाधिक जागांवर प्रत्येकी ४ जागांवर मतदान घेतलं जाईल.

निवडणूक आयोगानं जारी केलेल्या निवेदनानुसार, १० राज्यांमधील विद्यमान खासदार २१ जून ते १९ जुलै दरम्यान वेगवेगळ्या तारखांना राज्यसभेतून निवृत्त होत आहेत. राज्यसभेच्या निवडणुका आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या प्रत्येक राज्यात ४ जागांसाठी मध्य प्रदेश आणि राजस्थान या प्रत्येक राज्यात तीन जागांसाठी, झारखंडमध्ये दोन जागांसाठी आणि मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश व मिझोराम या प्रत्येक राज्यात एका जागेसाठी होणार आहेत.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, दिग्विजय सिंह आणि माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांसारखे प्रमुख नेते राज्यसभा सदस्यत्वावरून निवृत्त होणार आहेत. राजस्थानमधील राजेंद्र गहलोत, नीरज डांगी आणि रवनीत सिंह यांच्याकडील जागाही रिक्त होणार आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार, १ जून रोजी अधिकृत अधिसूचना जारी केली जाईल. उमेदवार ८ जूनपर्यंत आपले उमेदवारी अर्ज दाखल करू शकतील. उमेदवारी अर्जांची छाननी ९ जून रोजी होईल, तर उमेदवारांना आपली नावं मागं घेण्यासाठी ११ जूनपर्यंत मुदत असेल.

निवडणूक आयोगानं विशेष निर्देश जारी केले : निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेसंदर्भात विशेष निर्देश जारी केले आहेत. आयोगानं स्पष्ट केलं आहे की, मतदानादरम्यान केवळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पुरवलेला विशेष जांभळ्या रंगाचा स्केच पेनच वापरला जावा. इतर कोणत्याही पेनाचा वापर करण्यास परवानगी दिली जाणार नाही. निष्पक्ष मतदान सुनिश्चित करण्यासाठी निरीक्षकांचीही नियुक्ती केली जाईल.



संपादकीय...

## विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची हत्या थांबली पाहिजे

पूजा खेडकर प्रकरण समोर आलं, तेव्हा देशातील अनेक तरुणांच्या मनात व्यवस्थेबद्दल पहिला मोठा प्रश्न निर्माण झाला. मेहनतीपेक्षा पळवाटा आणि प्रभाव यांना अधिक महत्त्व दिलं जातंय का, अशी भावना अनेकांच्या मनात निर्माण झाली होती. मात्र NEET पेपरफुटी प्रकरण समोर आल्यानंतर हा प्रश्न आणखी गंभीर झाला. कारण ही केवळ एका परीक्षेची चूक नव्हती, तर लाखो विद्यार्थ्यांच्या विश्र्वासावर झालेला थेट आघात होता. आज देशातील विद्यार्थी प्रचंड स्पर्धेतून जात आहेत. एका सीटसाठी हजारो विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेतात. डॉक्टर होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी ते स्वतःचं संपूर्ण आयुष्य काही वर्षांसाठी थांबवून ठेवतात. अनेक विद्यार्थी दिवसाचे १६ ते १८ तास अभ्यास करतात. मोबाईलपासून दूर राहतात. मित्र, सण, आनंद, फिरणं सगळं बाजूला ठेवतात. त्यांच्या आयुष्यात फक्त एकच ध्येय असतं – परीक्षा उत्तीर्ण होणं. एका मार्कासाठी ते स्वतःला झोकून देतात. रात्री उशिरापर्यंत अभ्यास करून पुस्तकावरच झोप लागते. सकाळी उठल्यानंतरही मनात अपराधीपणाची भावना असते की अजून थोडा अभ्यास व्हायला हवा होता. ही स्पर्धा फक्त अभ्यासापुरती मर्यादित नसते. ती मानसिक आणि भावनिक संघर्षही असतो. अपयशाची भीती, कुटुंबाच्या अपेक्षा आणि भविष्याची चिंता विद्यार्थ्यांना सतत त्रास देत असते. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी डॉक्टर होणं ही फक्त पदवी नसते. ती संपूर्ण कुटुंबाच्या संघर्षातून बाहेर पडण्याची आशा असते. आई-वडिलांचं आयुष्यभराचं स्वप्न त्या एका मुलाच्या यशाशी जोडलेलं असतं. अनेक पालक स्वतःच्या गरजा बाजूला ठेवतात. नवीन कपडे, फोन किंवा इतर सुखसोयी टाळून मुलांच्या शिक्षणासाठी पैसे साठवतात. कारण त्यांना वाटतं की मुलाचं शिक्षणच कुटुंबाचं भविष्य बदलू शकतं. पण जेव्हा प्रश्र्नपत्रिका पैशाने विकत घेतली जाते, तेव्हा या सर्व मेहनतीचा अर्थच उरत नाही. पैसा आणि ओळखीच्या जोरावर काही लोक पुढे जातात, ही भावना मेहनती विद्यार्थ्यांना आतून तोडून टाकते. ज्याच्याकडे फक्त मेहनत आहे, तो अनेकदा एका-दोन मार्कांनी मागे पडतो. त्या काही मार्कांमागे त्याचं तुटलेलं स्वप्न आणि हरवलेला आत्मविश्र्वास दडलेला असतो. अनेक विद्यार्थी अपयशाचं खापर स्वतःवर फोडतात. मीच कमी पडलो, असं त्यांना वाटू लागतं. पण प्रत्यक्षात त्यांच्या मेहनतीत कमतरता नसते; कमतरता असते ती व्यवस्थेच्या प्रामाणिकपणात. स्पर्धा परीक्षा या खरंतर देशातील गुणवत्तेची चाचणी असायला हव्यात. पण जर त्यातच भ्रष्टाचार शिरला, तर प्रामाणिक विद्यार्थ्यांसाठी संधी कमी होत जाते. सरकारने परीक्षा रद्द केली, चौकशी सुरू केली आणि दोषींवर कारवाई करण्याची भाषा केली. पण यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर झालेल्या मानसिक परिणामांची भरपाई होऊ शकते का, हा मोठा प्रश्र्न आहे. २३ लाख विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी मेहनत घेतली होती. अनेक कुटुंबांनी शेवटचे पैसे कोचिंग आणि फॉर्म फीमध्ये खर्च केले होते. त्या त्यागाचं मोल कोण भरून काढणार? आज अनेक विद्यार्थ्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. मेहनत करून खरंच यश मिळतं का? हा प्रश्र्न त्यांना सतावत आहे. हीच या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. शिक्षण व्यवस्थेवरचा विश्र्वास टिकवायचा असेल, तर परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि सुरक्षित करावी लागेल. पेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणं तितकंच आवश्यक आहे. कारण शिक्षण ही फक्त नोकरी मिळवण्याची प्रक्रिया नाही. ती समाज घडवण्याची ताकद आहे. शिक्षण व्यवस्थाच जर भ्रष्ट झाली, तर देशाचं भविष्यही असुरक्षित होईल. उद्याचा डॉक्टर, अभियंता किंवा अधिकारी ज्ञानाने तयार व्हायला हवा, पैशाच्या जोरावर नाही. अन्यथा समाजात गुणवत्तेपेक्षा पैशाचं महत्त्व वाढत जाईल. ही फक्त पेपरफुटी नाही. ही लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या विश्र्वासाची हत्या आहे. आणि जेव्हा मेहनती विद्यार्थ्यांची स्वप्नं तुटतात, तेव्हा फक्त एक विद्यार्थी हरत नाही – तर देशाचं भविष्य थोडं थोडं कमकुवत होत जातं.

# डॉलर ९७ च्या उंबरठ्यावर; रुपयाची घसरण आणि सामान्यांच्या खिशाला बसणारा फटका



महागाई, इंधनदर आणि वाढती आर्थिक अस्थिरता – भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील मोठं आव्हान

भारतीय रुपयाची घसरण हा आता केवळ अर्थतज्ज्ञ किंवा शेअर बाजारापुरता मर्यादित विषय राहिलेला नाही; तर तो थेट सामान्य नागरिकांच्या स्वयंपाकघरापासून व्यवसायापर्यंत पोहोचलेला प्रश्र्न बनला आहे. अमेरिकन डॉलरचा दर ९७ रुपयांच्या दिशेने झेपावत असताना भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानावर त्याचे गंभीर परिणाम दिसू लागले आहेत.

आज भारत जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जातो. GDP growth, डिजिटल अर्थव्यवस्था, स्टार्टअप्स आणि वाढती गुंतवणूक यामुळे देशाची प्रतिमा मजबूत झाली असली तरी रुपयाची सातत्याने होत असलेली घसरण ही आर्थिक व्यवस्थेतील कमकुवत बाजू अधोरेखित करते.

---

**रुपया कमजोर झाला म्हणजे नेमकं काय होतं?**

सामान्यतः अनेकांना वाटतं की डॉलर महाग झाला म्हणजे फक्त परदेश प्रवास किंवा आयफोनसारखी विदेशी उत्पादने महाग होतात. पण प्रत्यक्षात रुपयाची घसरण ही संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारी साखळी प्रक्रिया असते.

भारत आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाची खरेदी डॉलरमध्ये केली जाते. त्यामुळे डॉलर मजबूत झाला की भारताला त्याच प्रमाणातील तेलासाठी अधिक रुपये मोजावे लागतात. परिणामी पेट्रोल-डिझेलचे दर वाढतात.

इंधनदर वाढले की त्याचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होतो. ट्रक, रेल्वे, लॉजिस्टिक आणि वितरण खर्च वाढल्याने अन्नधान्य, भाजीपाला, दूध, बांधकाम साहित्य, औषधे आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती वाढतात. म्हणजे रुपयाची घसरण ही अप्रत्यक्ष महागाई निर्माण करते.

---

**मध्यमवर्ग आणि सामान्य नागरिक सर्वाधिक दबावाखाली**

रुपयाच्या घसरणीचा सर्वाधिक परिणाम मध्यमवर्गीय आणि नोकरदार वर्गावर होत आहे. कारण उत्पन्न वाढीचा वेग आणि खर्च वाढीचा वेग यात मोठी तफावत निर्माण होत आहे.

**घरगुती बजेट कोलमडत आहे**

EMI आणि शिक्षण खर्च वाढत आहेत

वैद्यकीय खर्चावर दबाव वाढतोय

परदेशात शिक्षण घेणे अधिक महाग होत आहे

इलेक्ट्रॉनिक्स आणि तंत्रज्ञान उपकरणांच्या किंमती वाढत आहेत

विशेषतः लघुउद्योग आणि छोटे व्यापारी डॉलरच्या चढउतारामुळे अधिक अडचणीत सापडतात. कारण आयात होणाऱ्या कच्च्या मालाचा खर्च वाढल्याने उत्पादन खर्च वाढतो आणि स्पर्धात्मकता कमी होते.

**रुपयावरील दबाव का वाढतोय?**

रुपयाच्या घसरणीमागे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कारणे आहेत.

**१. अमेरिकेतील व्याजदर वाढ**

अमेरिकेची केंद्रीय बँक Federal Reserve व्याजदर वाढवते तेव्हा जागतिक गुंतवणूकदार अमेरिकेकडे वळतात. त्यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख बाजारातून विदेशी गुंतवणूक बाहेर पडते आणि रुपयावर दबाव वाढतो.

**२. आयात-निर्यात असंतुलन**

भारताची आयात निर्यातीपेक्षा जास्त आहे. विशेषतः तेल आणि इलेक्ट्रॉनिक्सवरील आयात अवलंबित्व मोठं असल्याने डॉलरची मागणी कायम वाढते.

**३. जागतिक युद्धजन्य परिस्थिती**

रशिया-युक्रेन संघर्ष, मध्यपूर्वेतील तणाव आणि जागतिक आर्थिक अनिश्र्चितता यामुळे सुरक्षित चलन म्हणून डॉलर अधिक मजबूत होत आहे.

**४. विदेशी गुंतवणुकीतील घट**

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार (FII) भारतीय बाजारातून पैसा काढू लागले की रुपयावर नकारात्मक परिणाम होतो.

---

**RBI हस्तक्षेप किती प्रभावी?**

भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) वेळोवेळी डॉलर विकून रुपयाला आधार देण्याचा प्रयत्न करते. विदेशी चलन साठ्याचा वापर करून विनिमय दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न होतो. मात्र हा उपाय तात्पुरता असतो.

दीर्घकालीन स्थैर्यासाठी भारताने मजबूत उत्पादनक्षमता, निर्यात वाढ आणि परकीय गुंतवणूक यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

---

**पुढचा मार्ग काय?**

भारतीय अर्थव्यवस्थेला दीर्घकालीन मजबुती देण्यासाठी काही महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे :

Make in India ला प्रत्यक्ष गती देणे

उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे

निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन

तेलावरील आयात अवलंबित्व कमी करणे

डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी व्यापार प्रणाली विकसित करणे

रोजगारनिर्मिती आणि स्थानिक उद्योगांना चालना देणे

---

**खरी आर्थिक ताकद कुठे मोजली जाते?**

एखाद्या देशाची अर्थव्यवस्था केवळ GDP growth, Sensex किंवा विदेशी गुंतवणुकीने मजबूत ठरत नाही. सामान्य नागरिकाची क्रयशक्ती टिकून राहणे, महागाई नियंत्रणात असणे आणि जीवनमान स्थिर राहणे हेच आर्थिक आरोग्याचे खरे निर्देशक असतात.

आज भारतीय अर्थव्यवस्थेसमोर सर्वात मोठं आव्हान हेच आहे – वाढत्या महागाईच्या आणि कमकुवत होत चाललेल्या रुपयाच्या दबावातून सामान्य नागरिकाला कसं वाचवायचं?

---

लेखक :

Tanaji Pawar
Investment Banking Professional, Pune
Banking, Economy Financial Market Analysis अभ्यासक
RBI Policy, Inflation, Stock Market, Taxation आणि Indian Economy

# रक्तदान करण्यासाठी प्रलोभन देणे चुकीचा पायंडा

रक्तदान हे स्वेच्छेने, नि:स्वार्थपणे, आणि अहेतुक केलं पाहिजे, असं जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि भारत सरकारचं धोरण आहे. प्रलोभन देऊन रक्तदान करवून घेणं चुकीचा पायंडा मानला जातो. मात्र सध्या लातुरात रक्तदान करवून घेण्यासाठी प्रलोभन देण्याची स्पर्धा सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

**कायद्याने प्रतिबंधित आहे** Drugs and Cosmetics Act, 1940 National Blood Polic, २००२ नुसार:

- रक्त विकत घेणं किंवा विकणं पूर्णपणे बेकायदेशीर आहे.
- रक्तासाठी पैसा, भेटवस्तू, सवलती, सुट्टी, प्रमाणपत्रासाठी गुण इ. स्वरूपात प्रलोभन देता येत नाही.
- National Blood Transfusion Council (NBTC) च्या मार्गदर्शक तत्वांनुसार फक्त voluntary non-remunerated blood donation ला मान्यता आहे.
- दोषी आढळल्यास रक्तपेढीचा परवाना रद्द होऊ शकतो.

**रक्ताच्या सुरक्षिततेला धोका**

- प्रलोभनामुळे उच्च जोखीम गटातील लोक रक्तदानासाठी येतात:
- खरी माहिती लपवणे: पैसे/बक्षीसाच्या हव्यासापोटी लोक HIV, Hepatitis B/C, Syphilis सारख्या आजारांचा इतिहास लपवतात.
- Window Period धोका: संसर्ग झाल्यानंतरही चाचणीत लगेच निदान होत नाही. पैसे घेणारे व्यावसायिक दाते वारंवार रक्त देतात, त्यामुळे रुग्णाला संसर्ग झालेले रक्त जाण्याचा धोका वाढतो.
- WHO चा डेटा: ऐच्छिक दात्यांच्या तुलनेत पैसे घेणाऱ्या दात्यांच्या रक्तात संसर्गाचे प्रमाण ३-४ पट जास्त असते.
- नैतिक आणि सामाजिक कारणे

  **दान चा अर्थ संपतो:** रक्तदान हा जीवदानाचा संस्कार आहे. त्याला व्यवहार बनवल्यास त्याचं पावित्र्य कमी होतं.
- **गरीबांचं शोषण:** गरजू, कुपोषित, व्यसनी लोक पैशांसाठी वारंवार रक्त देतात, ज्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका.
- **चुकीची सवय:** एकदा प्रलोभनाची सवय लागली की, लोक विनामूल्य रक्तदान करायला पुढे येत नाहीत. मदत ही भावना संपून सौदा सुरू होतो.

**योग्य मार्ग कोणता?**

- **जनजागृती:** रक्तदानाचे महत्व, गैरसमज दूर करणे, रक्ताचा कारखाना नाही हे पटवून देणे.
- **सन्मान:** रक्तदात्याचा सत्कार, समाजात प्रतिष्ठा, हीरो म्हणून ओळख.
- **सुविधा:** जवळच्या ठिकाणी शिबीर, कमी वेळ, स्वच्छता, चांगली वागणूक.
- **नियमित दाता निर्माण:** १८-६५ वयोगटातील निरोगी व्यक्तीने दर ३ महिन्यांनी रक्तदान करावे, यासाठी समुपदेशन.

प्रलोभनाने रक्त मिळेल, पण ते सुरक्षित रक्त असेलच याची खात्री नाही. एका रुग्णाचा जीव वाचवताना दुसऱ्या रुग्णाला संसर्ग झाला, तर ते दान कसले? म्हणूनच WHO चे लक्ष्य आहे: १००% रक्तपुरवठा ऐच्छिक, मोफत दात्यांकडूनच व्हावा. रक्तदान करा, पण ते जीव वाचवण्यासाठी करा, काही मिळवण्यासाठी नाही. शक्यतो शासकीय रक्तपेढीत रक्तदान करावे खरी गरज आहे ती शासकीय रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गंभीर रुग्णांना, थायलेसेमिया तसेच अपघातग्रस्त रुग्णांना. खासगी रक्तपेढी चालक आणि रक्तदान शिबीर आयोजकांनी थोडी काळजी घेतली तर रक्तदाना सारख्या पवित्र कार्यात समाजातील सर्व स्तरातील घटकांना विनाप्रलोभन सामावून घेतले जाऊ शकते. रक्तदान चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी चला प्रलोभनाशिवाय रक्तदान करून जीवनदानाचा संकल्प करू या!

जय हिंद



.........................

**सतीश तांदळे**
माझं लातूर परिवार

# चला ! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेवूया !




ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला " ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी-महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. 'जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा' हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबाजवणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे.

बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

कारण संकटे येत राहतात पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे. तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवूया ! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया !

**प्रवीण टाके**
उपसंचालक, (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
९७०२८५८७७७

# दि.बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भा.बौ. महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेचा बौध्दाचार्य श्रामणेर व बाल श्रामणेर शिबीर समारोप सोहळा यशस्वीरित्या संपन्न

**नवी मुंबई / के. एच. हनवते :**

भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने मंगळवार दिनांक १९ / ०५/ २०२६ रोजी सायंकाळी ठिक ६.३० वाजता बौद्धाचार्य श्रामणेर व बाल श्रामणेर धम्म प्रशिक्षण शिबिर समारोप सोहळा संपन्न करण्यात आला. या सोहळ्यासाठी पुज्य वंदनीय भन्ते धम्मपालजी ( संघनायक) व पुज्य वंदनीय भन्ते कौंडिण्य ( आयु . प्रकाश माने गुरुजी - निवासी-केंद्रिय शिक्षक) यांच्या अधिपत्त्याखाली व जिल्ह्याचे अध्यक्ष आद. विजय झनके (जिल्हाध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली तद्वतच प्रकाश भालेराव गुरुजी ( संस्कार - उपाध्यक्ष ) यांच्या अध्यक्षतेखाली बौद्धाचार्य श्रामणेर व बाल श्रामणेर धम्म प्रशिक्षण शिबीर समारोप सोहळा मोठ्या हर्षोल्हासात सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर भवन पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर नवी मुंबई येथे संपन्न करण्यात आला.

सर्वप्रथम आदर्शांची पुजा वंदनीय भन्ते धम्मपालजी व केंद्रिय पदाधिकारी डॉ. एस. के. भंडारे गुरुजी ( राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय कार्यालय प्रमुख ) इतर केंद्रिय पदाधिकारी व महाराष्ट्र राज्य पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आली. या नंतर भन्तेंनी सामुहिक त्रिसरण पंचशील दिले. नवी मुंबई जिल्ह्याचे संरक्षण उपाध्यक्ष व समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा बटालियनचे मेजर जनरल मधुकर हिवराळे गुरुजी यांनी रिपोर्टिंग करून सर्व अधिकारी व सैनिकांनी मान्यवरांना कडक सलामी दिली, उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले . श्रामणेर संघातील व बाल श्रामणेर संघातील भन्तेंनी आपले मनोगत व्यक्त केले . प्रास्ताविक विजय झनके गुरुजी (जिल्हाध्यक्ष - नवी मुंबई) यांनी केले. आयु.दत्तात्रय हराळ गुरुजी यांनी नवी मुंबई जिल्ह्यामध्ये करीत असलेल्या धम्मकार्याबद्दलची दखल घेऊन नवी मुंबई जिल्ह्यातुन जिल्हा शाखेच्या वतीने शाखेचा पहिला " धम्मसेवक पुरस्कार २०२६ " देवुन त्यांचा गौरव डॉ . ॲड.एस.के.भंडारे गुरुजींच्या हस्ते करण्यात आला. यु .जी . बोराडे गुरुजी (अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य ), ॲड एस.एस. वानखेडे (राष्ट्रीय सचिव तथा केंद्रिय प्रशिक्षण विभाग प्रमुख ) त्याचप्रमाणे बी.एच.गायकवाड





गुरुजी ( राष्ट्रीय सचिव ) या मान्यवरांनी अप्रतिम मार्गदर्शन करून महापुरुषांचे समतेचे कार्य पुढे घेवुन जावे . धम्मक्रांती गतिमान करावी, बीएसआय मिशननुसार धम्म कार्य जोमाने करावे उपवर्गीकरण, जातीय जणगणना या विषयांवर सर्वांनी प्रकाश टाकला, तथागत बुध्दांच्या २४ आऱ्यांप्रमाणे आपले प्रत्येकाचे कार्य असले पाहीजे. अशा प्रकारचा संदेश मान्यवरांनी दिला. सर्व बौद्ध बांधवांनी चिवर परिधान करून न्याय स्वातंत्र्य व बंधुता निर्माण केली पाहीजे. असे विचार डॉ . एस .के.भंडारे गुरुजींनी व्यक्त केले .धम्म कार्य जोमाने करण्यासाठी उर्जा निर्माण केली, या कार्यक्रमासाठी मा .बापु निकाळजे ( कार्यालयीन सचिव - महाराष्ट्र राज्य ) मा. जयवंत लव्हांडे ( संघटक - महाराष्ट्र तथा कोकण विभाग प्रभारी ) मा महादेव गायकवाड ( पर्यटन सचिव - मुंबई प्रदेश) नवी मुंबई जिल्हा महिला जिल्हाध्यक्षा : शोभाताई कांबळे प्रामुख्याने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण मा. प्रकाश भालेराव यांनी केले. या सोहळ्याचे सुत्रसंचालन मा .संजय झनके गुरुजी (सरचिटणीस - नवी मुंबई जिल्हा ) यांनी केले . मा . प्रकाश भालेराव गुरुजी ( संस्कार - उपाध्यक्ष ) यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले . पुज्य वंदनीय भन्ते धम्मपालजी आणि पुज्य. भन्ते कौंडिण्य आणि त्यांच्या संघाने आशिर्वाद दिला .

हा सोहळा यशस्वी होण्यासाठी पुज्य.भन्ते कौंडिण्य पुर्वाश्रमीचे नांव आयु . प्रकाश माने गुरुजी (निवासी केंद्रिय शिक्षक ) यांनी खुप चांगल्या प्रकारे संघाची देखभाल केली. जबाबदारी पार पाडली. जिल्हा पदाधिकारी प्रा. गौतम सोनकांबळे (हिशोब तपासणीस) दत्तात्रय हराळ (कार्यालयीन सचिव) हिरामण थोरात (सचिव - संस्कार) मधुकर हिवराळे (उपाध्यक्ष - संस्कार) दिपक कांबळे (सचिव - संरक्षण) राजश्रीताई पारधे (सचिव - पर्यटन) देव प्रधान (सचिव - संस्कार) अजय माळवे (सचिव - संरक्षण) आनंदबोधी निकाळजे (संघटक) सुरेखाताई सावंत (संघटक) कविताताई कांबळे (संघटक) कल्पनाताई कांबळे (संघटक) मनिषाताई गंगावणे (संघटक) दगडु कांबळे (संघटक) महिला जिल्हा पदाधिकारी ज्योतीताई जाधव सरचिटणीस - महिला जिल्हा शाखा , छायाताई दिवे ( कोषाध्यक्ष - महिला जिल्हा शाखा, द्वारकाताई माघाडे ( संघटक ), अनिताताई अहीरे - संघटक (उपाध्यक्षा - पर्यटन महिला जिल्हा), मायाताई मनवर ( संघटक - महिला जिल्हा ) नवी मुंबई जिल्हा अंतर्गत शहर व वार्ड शाखा पदाधिकारी व नवी मुंबई जिल्ह्यातील इतर उपासक आणि उपासिका यांनी श्रामणेर संघास सकाळचा नास्ता , दुपारचे सुगरास असे भोजन व संध्याकाळचा फलआहार व वेगवेगळ्या स्वरुपामध्ये , आर्थिक दान देवुन दानपारमिता पालन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानीत करण्यात आले, पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर या शाखेचे अध्यक्ष सतिष खंडाळे गुरुजी , नितिन बनसोडे ( कोषाध्यक्ष ) श्रामणेर शिबीराचे प्रवचनकार विषय शिक्षक केंद्रिय शिक्षक, शिक्षिका बौध्दाचार्य बौध्दाचार्या,सैनिक उपासक आणि उपासिका प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे व दानदाते यांचे आभार मानुन सरणत्तय घेवुन श्रामणेर शिबीर समारोप सोहळ्याचा समारोप करण्यात आला ! बी.एच.गायकवाड गुरुजी ( राष्ट्रीय सचिव ) या मान्यवरांनी अप्रतिम मार्गदर्शन करून महापुरुषांचे समतेचे कार्य पुढे घेवुन जावे, धम्मक्रांती गतिमान करावी बीएसआय मिशन- २५ नुसार धम्म कार्य जोमाने करावे. उपवर्गीकरण, जातीय जणगणना या विषयांवर सर्वांनी प्रकाश टाकला. तथागत बुध्दांच्या २४ आऱ्यांप्रमाणे आपले प्रत्येकाचे कार्य असले पाहीजे. अशा प्रकारचा संदेश मान्यवरांनी दिला. सर्व बौद्ध बांधवांनी चिवर परिधान करून न्याय स्वातंत्र्य व बंधुता निर्माण केली पाहीजे असे विचार डॉ. एस .के. भंडारे साहेबांनी व्यक्त केले, धम्म कार्य जोमाने करण्यासाठी उर्जा निर्माण केली. या कार्यक्रमासाठी मा. बापु निकाळजे ( कार्यालयीन सचिव - महाराष्ट्र राज्य ) मा .जयवंत लव्हांडे ( संघटक - महाराष्ट्र तथा कोकण विभाग प्रभारी ) मा. महादेव गायकवाड ( पर्यटन सचिव - मुंबई प्रदेश) नवी मुंबई जिल्हा महिला जिल्हाध्यक्षा आदरणीय शोभाताई कांबळे प्रामुख्याने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण मा . प्रकाश भालेराव यांनी केले, या सोहळ्याचे सुत्रसंचालन मा. संजय झनके गुरुजी (सरचिटणीस - नवी मुंबई जिल्हा ) यांनी केले. मा . प्रकाश भालेराव गुरुजी ( संस्कार - उपाध्यक्ष ) यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले पुज्य वंदनीय भन्ते धम्मपालजी आणि पुज्य पुज्य भन्ते कौंडिण्य आणि त्यांच्या संघाने आशिर्वाद दिला.

हा सोहळा यशस्वी होण्यासाठी पुज्य.भन्ते कौंडिण्य पुर्वाश्रमीचे नांव आयु . प्रकाश माने गुरुजी (निवासी केंद्रिय शिक्षक ) यांनी खुप चांगल्या प्रकारे संघाची देखभाल केली. जबाबदारी पार पाडली. जिल्हा पदाधिकारी प्रा. गौतम सोनकांबळे (हिशोब तपासणीस) दत्तात्रय हराळ (कार्यालयीन सचिव) हिरामण थोरात (सचिव - संस्कार) मधुकर हिवराळे (उपाध्यक्ष - संस्कार) दिपक कांबळे (सचिव - संरक्षण) राजश्रीताई पारधे (सचिव - पर्यटन) देव प्रधान (सचिव - संस्कार) अजय माळवे (सचिव - संरक्षण) आनंदबोधी निकाळजे (संघटक) सुरेखाताई सावंत (संघटक) कविताताई कांबळे (संघटक) कल्पनाताई कांबळे (संघटक) मनिषाताई गंगावणे (संघटक) दगडु कांबळे (संघटक) महिला जिल्हा पदाधिकारी ज्योतीताई जाधव सरचिटणीस - महिला जिल्हा शाखा छायाताई दिवे ( कोषाध्यक्ष - महिला जिल्हा शाखा, द्वारकाताई माघाडे ( संघटक ), अनिताताई अहीरे - संघटक (उपाध्यक्षा - पर्यटन महिला जिल्हा), मायाताई मनवर ( संघटक - महिला जिल्हा ) नवी मुंबई जिल्हा अंतर्गत शहर व वार्ड शाखा पदाधिकारी व नवी मुंबई जिल्ह्यातील इतर उपासक आणि उपासिका यांनी श्रामणेर संघास सकाळचा नास्ता, दुपारचे सुगरास असे भोजन व संध्याकाळचा फलआहार व वेगवेगळ्या स्वरुपामध्ये, आर्थिक दान देवुन दानपारमिता पालन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानीत करण्यात आले.

पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर या शाखेचे अध्यक्ष सतिष खंडाळे गुरुजी, नितिन बनसोडे (कोषाध्यक्ष) श्रामणेर शिबीराचे प्रवचनकार विषय शिक्षक केंद्रिय शिक्षक, शिक्षिका बौध्दाचार्य बौध्दाचार्या,सैनिक उपासक आणि उपासिका प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे व दानदाते यांचे आभार मानुन सरणत्तय घेवुन श्रामणेर शिबीर समारोप सोहळ्याचा समारोप करण्यात आला !

# केज येथील सरस्वती कन्या प्रशालेच्या गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार संपन्न

**केज/प्रतिनिधी :** केज येथील माऊली विद्यापीठ केज संचलित सरस्वती कन्या प्रशाला व उच्च माध्यमिक विद्यालय येथे दिनांक २२ मे२०२६ रोजी एस.एस.सी. परीक्षेमध्ये शाळेतून प्रथम आलेल्या व एन.एम.एम. एस. परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थिनींचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थिनी यांना निमंत्रित करण्यात आले होते.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत सरस्वती कन्या प्रशालेतून सर्वप्रथम आलेली विद्यार्थिनी कुमारी मंजिली घाडगे हिने ९०.८० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. कुमारी जानवी पंडित ने ८९.८० टक्के गुण घेऊन शाळेतून द्वितीय आली आहे तर कुमारी जंगम श्रावणी हिने ८७.६० टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा बहुमान संपादित केला आहे या सर्व विद्यार्थिनींचा शुक्रवार रोजी शाळेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्य श्रीमती डोंगरे मॅडम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.गुंड सर,श्री.जोगदंड सर, श्रीमती नेरकर मॅडम,सौ.लामतुरे मॅडम इत्यादी शिक्षक वृंद व गायकवाड सर ग्रंथपाल हे उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये यशाचा मान मिळवून सत्कार घेण्यासाठी यशस्वी झालेली झालेली कुमारी गार्गी गवळी हिने एन.एम.एम. एस.परीक्षेमध्ये ४८ हजार रुपये ची स्कॉलरशिप प्राप्त केलेली आहे.तसेच गार्गी गवळीने इयत्ता



आठवी स्कॉलरशिप परीक्षेमध्येही घवघवीत यश संपादन केलेले आहे. सुदरील विद्यार्थिनींचे पालकही यावेळी कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामध्ये श्री.घाडगे,श्रीमती मीरा गवळी,श्री.पंडित दत्तात्रय इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सर्व गुणवंत विद्यार्थीनींचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## मुंबई विमानतळापेक्षा नवी मुंबई विमानतळावरील विमान प्रवास महागला, १ जूनपासून नवीन शुल्क लागू

**मुंबई :** मुंबईतील सांताक्रूझ आणि अंधेरी विमानतळानंतर नवी मुंबईत विमानतळ सुरु करण्यात आलंय. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ डिसेंबरमध्ये सुरुवात झाली. त्यानंतर या विमानतळावर पोहोचण्यासाठीचा खर्च हा विमान तिकीटपेक्षाही महाग आहे. तर आता त्यात अजून एक भर म्हणजे १ जून २०२६ पासून विमान तिकीट महाग होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे मुंबई विमानतळापेक्षा नवी मुंबई विमानतळाचा प्रवास महाग असणार आहे. यामागील कारण म्हणजे वापरकर्ता विकास शुल्कात वाढ करण्यास भारतीय विमानतळ आर्थिक नियामक प्राधिकरणाने मंजुरी देण्यात आली. आता १ जून २०२६ पासून नवी मुंबई विमानतळावरील विमान तिकीटात वापरकर्ता विकास शुल्क लावले जाणार आहे. या वाढीव शुल्कानुसार नवी मुंबई विमानतळावरील देशांतर्गत ६२० आणि आंतरराष्ट्रीय १२२५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीव वापरकर्ता विकास शुल्कामुळे विमान तिकीट महागणार आहे. मुंबई विमानतळाच्या तुलनेत नवी मुंबई विमानतळावरील शुल्क जास्त आहे. आर्थिक नियामक प्राधिकरणाने गेल्या वर्षी मे महिन्यात मुंबई विमानतळासाठी वापरकर्ता विकास शुल्क ठरलं आहे. १६ मे २०२५ ते ३१ मार्च २०२९ दरम्यान हे दर असणार आहे. या दरानुसार मुंबई विमानतळासाठी वापरकर्ता विकास शुल्क देशांतर्गत (जाणाऱ्या) प्रवाशासाठी १७५ आणि (येणाऱ्या) प्रवाशांसाठी ७५ रुपये आहेत. तर आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी जाणाऱ्या इकॉनॉमी क्लाससाठी ६१५ रुपये आणि बिझनेस क्लाससाठी ६९५ रुपये तर येणाऱ्या प्रवाशांसाठी हे शुक्ल २६० रुपये प्रति प्रवासी आहे.

# साळेगावच्या दलित वस्तीला घाणिचा विळखा!; दलित तरुणाईने ग्रामपंचायतचे पितळ उघडे पाडले!

- ग्रामपंचायतकडून राबवण्यात येणारा दलित वस्तीचा निधी गेला कुठे ? सवाल घेऊन दलित कार्येकर्ते आक्रमक!
- दलितवस्ती स्वचछतेसाठी पुढे सरसावत कार्यकर्ते आणि दलित युवकांनी केली नाल्यांची साफसफाई!

**केज/प्रतिनिधी :** साळेगाव हे तसे बाजार पेठ असलेले गाव महाराष्ट्र भर सर्वोपरीचीत असुन याठिकाणी सर्व जाती धर्माचे लोक राहतात. या ठिकाणी दलित समाज देखील मोठ्या प्रमाणात असुन या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या दलित वस्तीत मात्र ग्रामपंचायतने दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत येणारा निधी दलित वस्तीमध्ये खर्च न करता तो इतरत्र वळवल्याने कुठेही स्वचछता न झाल्यामुळे या वस्तीमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले आहे. जागोजागी नाल्या तुंबलेल्या, गटार आणि रस्त्यावर साचत असलेले पाणी यामुळे दलित वस्तीतील रहिवाशांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.

या संदर्भात दलित कार्यकर्ते आणि दलित युवकांनी गावचे सरपंच यांचेकडे वेळोवेळी तक्रार केली.परंतु म्हणतात ना चोराच्या उलट्या बोंबा या प्रमाणे सरपंच म्हतात की आपापली लेकरं घरात कोंडा. त्यांना रस्त्यावर सोडू नका. नाल्यांची साफसफाई करणे तर लांबच परंतु ग्रामपंचायतने नाल्यांची साफसफाई न केल्याने आम्ही काही कमी नाही म्हणत दलित कार्यकर्ते आणि दलित युवकांनी





एकत्र येऊन ग्रामपंचायत च्या नाकावर टिच्चून स्वता: च पुढे सरसावत नाल्यांची साफसफाई करून गावात व तालुक्यात एक आदर्श निर्माण केला आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव हे मोठी बाजारपेठ असलेले गाव असुन या ठिकाणी जनावरांचा मोठा आठवडी बाजार भरतो. तसे पाहाता या गावची लोकसंख्या मोठी आहे. ग्रामपंचायतला उत्पन्नही भरपूर प्रमाणात मिळते. शासनाच्या विविध योजनांचा निधी देखील गावच्या विकासासाठी मिळत आहे.

तसेच या ठिकाणी राहाणारा दलित समाज मात्र विकासा पासून कोसो दुर असल्याचे भयावह चित्र आज रोजी पहावयास मिळत आहे. दलितांच्या हक्काचा दलित वस्ती सुधार योजनेचा निधी हा दलितवस्तीतील विविध कामासाठी दिला जातो. मात्र साळेगाव ग्रामपंचायतने हा निधी दलित वस्तीमध्ये खर्च न करता तो इतरत्र वळवल्याने दलित वस्तीत कोणतेही काम केले नाही. त्यामुळे दलित वस्तीमध्ये अनेक नाल्या तुंबलेल्या अवस्थेत होत्या. तर रस्त्यावर घाणीचे पाणी साचून जागोजागी गटारे निर्माण झाली आहेत. त्यामुळे या दलित वस्तीत राहाणाऱ्या दलित बांधवांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात दलित कार्यकर्ते तथा बहुजन विकास मोर्चाचे केज तालुका उपाध्यक्ष रोहन बचुटे आणि दलित युवकांनी अनेक वेळा गावचे सरपंच आणि ग्रामसेवक यांचेकडे नाल्या साफसफाई करण्याची मागणी करुनही सरपंच यांनी कुठलेही काम केले नाही. उलट नाल्यांचा तुम्हाला व तुमच्या लेकरांना त्रास होत असेल तर आपापली लेकरं घरात कोंडा.. त्यांना रस्त्यावर सोडू नका. अशापध्दतीचे बोलुन दलित बांधवांना हिनवल्याने दलित बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. तर सध्या उन्हाळ्याचे दिवस संपले असुन आता पावसाळ्याचे दिवस जवळ तोंडावर असल्याने पावसाळ्यापुर्वी दलित वस्तीमधील नाली साफसफाईचे काम करणे गरजेचे असल्याने ग्रामपंचायतच्या विश्वासावर विसंबून न राहता दलित कार्यकर्ते तथा बहुजन विकास मोर्चा केज तालुका उपाध्यक्ष रोहन प्रभू बचुटे आणि साळेगाव येथील दलित युवकांनी एकत्र येऊन दलित वस्तीत असणाऱ्या तुंबलेल्या नाल्या सांडपाणी यामुळे रस्त्यावर निर्माण झालेली गटारे साफसूफ करत एक नवा आदर्श गावात निर्माण केला असून त्यांच्याकार्याचे कौतुक केज तालुकाभर होत आहे. या कार्यातून दलित कार्यकर्त्यांमधील असलेला स्वाभिमान नक्कीच दिसून येत असल्याने त्यांच्या या कार्याचे दलित बांधवांकडून व दलित जनतेकडून स्वागत करण्यात येत आहे. मात्र साळेगाव ग्रामपंचायतने दलित वस्तीसाठी आलेला निधी नेमका कुठे ? वापरला त्याचा हिशोब द्यावा असा सवाल उपस्थित केला असून या प्रकरणी दलित युवकांनी आक्रमक पवित्र घेत दलित कार्यकर्ते आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.

या उत्कृष्ट कार्यासाठी साळेगाव येथील बहुजन विकास मोर्चा केज तालुका उपाध्यक्ष रोहन प्रभू बचुटे, किशोर गायकवाड, अशोक बचुटे, आकाश बचुटे, प्रकाश बचुटे, चांद सय्यद, राजाभाऊ सरवदे, आप्पा कदम, सुशांत मुंडे, लक्ष्मण ओव्हाळ, शरद गायकवाड यांचेसह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

# मांग गारुडी समाजाने सामाजिक आर्थिक विकास एकजुटीने साध्य केला पाहिजे : दिगंबर सकट

**लातूर/प्रतिनिधी :** विलास नगर,नांदेड रोड मांग गारुडी वसाहत,लातूर येथे मांग गारुडी समाज परिवर्तन मेळावा संपन्न झाला.यावेळी मांग गारुडी समाजातील महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी मांग गारुडी समाजाचा इतिहास देशाला व समाजाला प्रेरणा देणारा इतिहास आहे इतिहासातले पहिले स्वातंत्र्य युद्ध माग गारुडी समाजाने अनेक भटक्या जाती जमातींना घेऊन पुकारले होते छत्रपती शिवाजी महाराज यांचा गमीनी कावा ही युद्ध निति अलंबून इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारा समाज म्हणजे मांग गारुडी समाज होय

जेव्हा इंग्रजांची सत्ता आपल्या देशावर आली तेव्हा इंग्रजांनी सन १८७१ ला गुन्हेगारी जाती जमाती कायदा अमलात आणला आणि ज्या स्वातंत्र्यासाठी ज्या जाती लढत होत्या त्या जातींना गुन्हेगार ठरवून त्यांची संस्कृती त्यांची वस्ती त्यांचे गाव उध्वस्त करण्याचे काम इंग्रज सरकारने केले आहे.या देशाच्या स्वातंत्र्यासाठी व सांस्कृतीसाठी मांग गारुडी समाजाचे फार मोठे योगदान आहे याची दखल इतिहासकारांनी घेतली नाही पण आमचा इतिहास आम्हाला माहित आहे इंग्रज सरकारने भटक्या विमुक्त समाजाच्या व माग गारुडी समाजाच्या जमिनी व त्याच्या मिळकती सर्व जप्त केल्या आणि गुन्हेगारी शिक्का त्यांचा कपाळी मारला जगण्यासाठी समाज गावोगावी भटकंती फिरू लागला पोट भरण्यासाठी चोरी करणे भिक मागणे हा व्यवसाय करून जगू लागला इंग्रज सरकार या समाजावर इतके अन्याय अत्याचार करत होते की त्यांनी ज्या गावांमध्ये मांग गारुडी समाज राहत आहे त्या गावातील पोलीस पाटील कुलकर्णी यांच्याकडे रात्री अपरात्री दिवसा हाजरी देणे बंधनकारक केले होते हा समाज पुन्हा बंड करू नये यासाठी महाराष्ट्र इलाख्यातील ५२ सेटलमेंट या जेलमध्ये समाजाची विभागणी केली आपल्या बायका मुलांना तोडून अनेक जेलमध्ये दाबून ठेवले काही लोकांना तारेच्या कुंपणामध्ये बंदिस्त करून ठेवले काही लोक उपाशी मरू लागले या कारणाने इंग्रजांनी त्यांना गावामध्ये राहण्याची परवानगी दिली पण पोलीस पाटील यांच्याकडून हाजरी लावण्यात आली ही गुलामगिरी व जुलूम बंद होण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म व्हावा लागला व त्याच्या हातून भारतीय राज्यघटना तयार व्हावी लागली आणि मग आमची सुटका झाली पण स्वातंत्र्य देशांमध्ये गोऱ्या लोकांचे राज्य गेले आणि काळ्या इग्रज लोकांचे राज्य आले या लोकांनी आम्हाला गावाच्या बाहेर ठेवले आमचा विकास करण्यास पुढे आले नाहीत आम्हाला शिक्षणापासून दूर ठेवले आमची अवस्था ना गावात घर ना शिवारात शेत जगण्यासाठी कोणते साधन उपलब्ध नसल्याने आज आमची अवस्था गुलामापेक्षाही भयंकर आहे हे स्वातंत्र्य देशाचे खरे चित्र आहे असे म्हणावे लागेल

गेली ७५ वर्षांमध्ये मांग गारुडी समाजाच्या वाट्याला काहीच आले नाही त्याचा विकास झाला नाही अज्ञानापोटी समाज गरीब आणि लाचारी गुलामा पेक्षा ही हिन जीवन जगत आहे त्याला जिम्मेदार सरकार व त्याचे प्रतिनिधी आहेत असे मी मानतो

आज महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीमधील वर्गीकरण म्हणजे अ ब क ड केले जाणार आहे सरकार म्हणते की याच्यावर आपण हरकती दाखल कराव्यात सरकार मागासवर्गीयामध्ये अनुसूचित जातीमध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे याला खतपाणी घालणारे याच पक्षाचे सरकारचे प्रतिनिधी आहेत न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल लोकांसमोर आलेला नाही मंत्रिमंडळामध्ये तिथे चर्चा झाली नाही तो अहवाल कोणत्या जिल्ह्यामध्ये झाला कोणत्या वस्तीमध्ये झाला कोणत्या विषयावर झाला याची कल्पनाच एससी मधल्या जातींना नाही आणि समाज माध्यमांमध्ये याच्यावर फार मोठ्या प्रमाणात चर्चा केली जाते समर्थन व विरोध केला जात आहे सरकार आपल्या मधे फूट पाडण्याच्या कामांमध्ये सफल झाले आहे असेच म्हणावे लागेल सध्या समाजाला आरक्षणाची गरज नसून




सैरक्षणाची गरज आहे एकजुटीची गरज आहे मागासवर्गीयांचा निधी इतर ठिकाणी वळवला जात आहे महाराष्ट्रामध्ये अनेक गावांमध्ये दररोज दलितावर अत्याचार अन्याय होत आहे याच्यावर चर्चा होणे गरजेचे आहे मागासवर्गीयांचा जो निधी गाव पातळी पासुन राज्यपातळीपर्यंत राज्यपातळीपासून देश पातळीपर्यंत जो आपल्या हक्काचा निधी आहे तो आणि विकासाच्या कामाखाली वळवला जात आहे शिक्षणाची दारे बंद केली जात आहेत याच्यावर चर्चा होणे अपेक्षित आहे आणि म्हणून मांग गारुडी समाज या आरक्षणाची भूमिका अहवाल प्रकाशित झाल्यावर योग्यवेळी घेईल यापुढे माग गारुडी समाजाने अज्ञानाची बाजू सोडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे एकत्र येऊन समाजाला जे लागेल ते करण्याचे संकल्प या मेळाव्यामधुन आम्ही घेतला आहे हा परिवर्तनाचा मेळावा समाजाच्या विकासाला चालना देण्यासाठी आहे सध्या महाराष्ट्रामधे प्रभोधन सभा होत आहेत या युवकांची मोठी फळी जोडली जात आहे हेच युवक समाजाची दिशा देण्याचे कार्य करीत आहेत असे मत दिगंबर सकट यांनी व्यक्त केले.

यावेळी मंचावर नेवालाल पात्रे साहेब नागपूर, दिगंबर सकट समाज प्रबोधनकार, कोल्हापूर,माजी नगरसेविका आयोध्या उपाध्ये, स्वागताध्यक्ष आदर्श उपाध्ये, सर्यकांत काळे,दिनकर फासगे,डी.डी. सकट सांगली,भारत चौगुले,रावजी कांबळे,लातूर,पप्पू राखपसरे पुणे,रामेश्र्वर सूर्यवंशी,लखन कांबळे,हिरामन कसबे पुणे,विकी लोंढे,दिपक लोंढे पुणे,सनी झेंडे,अमोल लोंढे,विलास लोंढे,राजेश कसबे,श्रीकांत सकट,गणेश उफाडे,एस. काळे,श्रीहरी काळे उपस्थित होते तर आयोजक म्हणून सुधीर कांबळे,राम कसबे, विकी कांबळे, दिपक सकट,महावीर सकट,नामदेव काले, गणेश काळे यांनी काम पाहिले.

## पिंपळगाव फाटा येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा, ७ लाख ८१ हजाराचा मुद्देमाल जप्त; ६ जण जेरबंद




**केज/प्रतिनिधी :** अहमदपूर - अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील केज तालुक्यातील पिंपळगाव फाटा येथील श्रीमंत धस यांच्या मालकिच्या पत्र्याच्या शेडमध्ये तीर्रट नावाचा जुगार सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांना मिळाल्या वरून त्यांनी विषेश पथकाला कारवाईचे आदेश देताच, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, जमादार राजू वंजारे, क्षीरसागर, धोंडीराम योगीराज मोरे यांनी गुरूवारी (दि.२१) दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान छापा टाकला. आसता मच्छींद्र केशव मोरे, श्रीमंत तुकाराम धस, लतीफ अब्दुल शेख, मनोहर गंगाधर केदार, अवधुत लिंबाजी धस, परमेश्वर रामकिसन साखरे हे तेथे तीर्रट नावाचा जुगार खेळताना आढळून आले. यावेळी केज पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक संदीप मांजरमे, जमादार बाळासाहेब अहंकारे, त्रिंबक सोपणे, गोरख फड, महिला पोलीस जमादार संगीता हणवते यांनीही घटनास्थळी भेट दिली. यावेळी पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून पाच मोबाईल, दोन मोटार सायकल व एक कारसह जुगाराचे साहित्य मिळून एकूण ८ लाख ८१ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विषेश पथकातील जमादार धोंडीराम मोरे यांच्या फिर्यादी वरून केज पोलिस ठाण्यात सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या नागपूर आयुक्तपदी संदीप देशमुख



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी संदीप जगन्नाथ देशमुख यांना महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या नागपूर आयुक्त पदाची तसेच गोपनीयतेची शपथ दिली.

मंत्रालयासमोरील नवीन प्रशासन भवनाच्या ७ व्या मजल्यावरील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात शपथविधी सोहळा संपन्न झाला. यावेळी कोकण विभागाचे आयुक्त बलदेव सिंग, अमरावती विभागाचे आयुक्त अरुण डोंगरे उपस्थित होते. तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त डॉ. किरण जाधव, नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी आणि पुणे विभागाचे आयुक्त सुधाकर तेलंग सहभागी झाले होते.

संदीप देशमुख हे अपर आयुक्त तथा विशेष निबंधक सहकारी संस्था (सेवानिवृत्त) म्हणून कार्यरत होते. त्यांच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाचा लाभ आयोगाच्या कार्याला होणार असल्याचे मुख्य आयुक्त श्रीवास्तव यावेळी म्हणाले. जनतेच्या अधिकारांचे संरक्षण करणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमच्या अंमलबजावणी संदर्भात क्षत्रीय अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे तसेच कामकाजाचा आढावा घेणे ही राज्य सेवा हक्क आयुक्त पदाची मोठी जबाबदारी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मनु कुमार श्रीवास्तव यांना संदीप जगन्नाथ देशमुख यांना राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर पदाची शपथ देण्यासाठी प्राधिकृत केले होते. माजी राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे दिलीप शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी आयोगाच्या सचिव वैशाली राज चव्हाण उपस्थित होत्या.

## पाकिस्तानला भारतीय लष्कराच्या हालचालींचं लाईव्ह फीड, हेरगिरीसाठी पठाणकोट मार्गावर लावला सीसीटीव्ही; दुबईतून यायच्या सूचना

नवी दिल्ली : पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी काही महिन्यांपूर्वी हरियाणामधून सहा जणांना अटक करण्यात आली होती. यामध्ये एका यूट्यूबर मुलीचा देखील समावेश होता. त्यानंतर दिल्लीतून एका सीआरपीएफ जवानाला पाकिस्तानला गोपनीय माहिती शेअर केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. या घटनानंतर संपूर्ण देशात मोठी खळबळ उडाली होती. त्या घटनानंतर आता पुन्हा एक अशाच प्रकारची हेरगिरीची घटना समोर आली आहे.

पंजाबमधील पठाणकोट येथून एका संशयिताला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. पठाणकोट येथील एका महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरा लावून भारतीय लष्कराच्या प्रत्येक हालचालींवर नजर ठेवली जात होती आणि लष्करी ताफ्यांबाबतची माहिती पाकिस्तानला पुरवली जात होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली असून या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

वृत्तानुसार, पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली पंजाबमधील पठाणकोट येथील एका व्यक्तीला अटक करण्यात असल्याची माहिती पठाणकोट पोलिसांनी दिली. या घटनेच्या प्राथमिक तपासात असं आढळून आलं की, महामार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरा लावून लष्कराच्या संदर्भातील आणि लष्कराच्या हालचालींची गुप्त माहिती पाकिस्तानला दिली जात होती.

## आईसक्रीम खरेदीचे बिल विचारल्याने पॅन्ट्रीकार कर्मचाऱ्यांकडून प्रवाशांना बेदम मारहाण !

वसई : धावत्या ट्रेनमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जयपूर सुपरफास्ट एक्स्प्रेसमध्ये केवळ आईस्क्रीम खरेदीचे बिल मागितल्याने मुंबईतील एका व्यवसायिकाला आणि त्यांच्या नातेवाईकाला पॅन्ट्री कारमधील कर्मचाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यात मितेश शहा हे प्रवासी जखमी झाले आहेत.याप्रकरणी वसई लोहमार्ग पोलिसांनी तीन पॅन्ट्री कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नसून पोलिसांनी आरोपींना केवळ नोटीस बजावली आहे. मितेश शाह हे आपल्या कुटुंबीय आणि मित्रांसह विक्रमगड आलोट १८ मे राजी रात्रीच्या सुमारास रेल्वे स्थानकावरून मुंबईच्या दिशेने प्रवास करत होते. या प्रवासा दरम्यान पॅन्ट्री कारमधील कर्मचाऱ्यांकडून त्यांनी ३० रुपयांना एक आईस्क्रीम विकत घेतले होते. या दरम्यान शाह यांनी आईस्क्रीमच्या पाकिटावर 'नॉट फॉर सेल' (विक्रीसाठी नाही) असे छापलेले पाहिले. त्यामुळे संशय आल्याने त्यांनी कर्मचाऱ्यांकडे खरेदीचे बिल मागितले. सुरुवातीला कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले.

## युवा कीर्तनकार यशवंत भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्तन करेल: प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयात बी.ए. द्वितीय वर्षात शिकणारा विद्यार्थी आणि युवा कीर्तनकार यशवंत कातळे याने कीर्तन सेवेतून मिळवलेल्या स्वतःच्या कमाईतून चारचाकी गाडी खरेदी केली. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने या गाडीचे पूजन करून यशवंतचा विशेष गौरव करण्यात आला. जिद्द, मेहनत आणि योग्य शैक्षणिक वातावरण लाभल्यास ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थीही यश मिळवू शकतो, हे यशवंतने सिद्ध केले आहे.

या कौतुक सोहळ्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि प्रसाद कातळे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. गायकवाड म्हणाले की, यशवंत इयत्ता तिसरीपासून कीर्तनसेवेत आहे. मात्र दयानंद महाविद्यालयात अकरावीत प्रवेश घेतल्यानंतर त्याच्या ज्ञानात प्रगल्भता आली.

तिसरीपासूनच कीर्तनाची आवड राज्यभर कार्यक्रम सुरू यशवंत कातळे याला लहानपणापासूनच अध्यात्माची आणि प्रबोधनाची गोडी असून तो इयत्ता तिसरीपासून कीर्तन करत आहे. दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्याला योग्य मार्गदर्शन मिळाले आणि त्याच्या ज्ञानात अधिक भर पडली. लहान वयातच संपूर्ण महाराष्ट्रभर कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन करत त्याने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्याच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि कष्टाचे महाविद्यालयातील प्राध्यापक व व्यवस्थापनाकडून विशेष कौतुक होत आहे.

## तब्बल एका वर्षानंतर बेपत्ता अल्पवयीन मुलाचा शोध

### शिवाजीनगर पोलिसांच्या तांत्रिक तपासाला मोठे यश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील सिग्नल कॅम्प परिसरातून जून २०२५ मध्ये बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलाचा तब्बल एका वर्षानंतर तिरुपती (आंध्रप्रदेश) येथून सुखरूप शोध घेण्यात शिवाजीनगर पोलिसांना यश आले असून, लातूर पोलिसांच्या चिकाटी, तांत्रिक तपास कौशल्य व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी प्रशांत हरीश्चंद्र गपाट, रा. इंदापूर ता. वाशी जि. धाराशिव यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले होते की, त्यांचा मुलगा अथर्व प्रशांत गपाट, (वय १४ वर्षे ९ महिने) हा सिग्नल कॅम्प, लातूर येथे वास्तव्यास असून दि. १७ जून २०२५ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे शाळेसाठी घराबाहेर पडला होता. त्यावेळी घरात त्याची बहीण उपस्थित होती. ती सकाळी ट्युशनवरून परत आल्यानंतर तिला अथर्व घरात दिसून आला नाही. त्याची शाळेची बॅग देखील घरात नसल्याने तो शाळेत गेला असावा असे तिला वाटले. मात्र, संध्याकाळपर्यंत तो घरी परत न आल्याने तिने वडिलांना संपर्क करून माहिती दिली.

फिर्यादी हे त्या वेळी मूळ गावी असल्याने ते दुसऱ्या दिवशी लातूर येथे आले. त्यांनी मुलाचा शाळा, ट्युशन क्लास, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच शहर व परिसरात सर्वत्र शोध घेतला. मात्र अथर्वचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून मुलास पळवून नेल्याची शंका व्यक्त करत त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुरनं. २२८/२०२५ कलम १३७(२) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर, मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर तसेच समिरसिंह साळवे उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि सुप्रिया केंद्रे व त्यांच्या तपास पथकाने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला.

तपासादरम्यान पोलिसांनी विविध तांत्रिक बाबींचा अभ्यास केला. अल्पवयीन मुलाने सोशल मीडियावर फेसबुक व इन्स्टाग्राम अकाउंट सुरू केल्याची माहिती मिळाल्यानंतर सायबर पोलीस स्टेशनच्या मदतीने सोशल मीडिया अकाउंटचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. विविध डिजिटल पुरावे आणि ऑनलाइन हालचालींचा अभ्यास करून पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली.

अत्यंत संयमाने आणि कौशल्यपूर्ण तपास करत अखेर दि. १९ मे २०२६ रोजी तिरुपती, आंध्रप्रदेश येथे अल्पवयीन मुलगा असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर तत्काळ पथक पाठवून संबंधित मुलास ताब्यात घेण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलास सुखरूपपणे त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर लातूर पोलिसांची संवाद बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी ईद-उल-अजहा (बकरी ईद) सण शांततापूर्ण, सलोख्याच्या वातावरणात व कायद्याच्या चौकटीत साजरा व्हावा यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विविध समाजघटक, धर्मगुरू व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत मुस्लिम समाजातील धर्मगुरू, हिंदूवादी संघटनांचे प्रतिनिधी, कुरेशी समाजाचे पदाधिकारी,तसेच गोरक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान पोलिसांकडून गोवंश हत्या बंदी कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत कायद्याचे उल्लंघन सहन केले जाणार नसल्याचे पोलीस प्रशासनाने ठामपणे स्पष्ट केले. कोणताही अनुचित प्रकार घडल्यास किंवा संशयास्पद हालचाल आढळल्यास नागरिकांनी






तात्काळ स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून दिनांक २० मे ते ३० मे २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्हाभर विशेष बंदोबस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. उपविभाग स्तरावर सात विशेष भरारी पथके तयार करण्यात आली असून त्यामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके जिल्ह्यात सतत गस्त घालून गोवंश हत्या बंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार आहेत.

तसेच राज्य सीमा, जिल्हा सीमा व जिल्ह्यातील संवेदनशील भागांमध्ये एकूण २२ ठिकाणी दिवसरात्र नाकाबंदी लावण्यात आली असून ३० मेपर्यंत ही विशेष तपासणी मोहीम सुरू राहणार आहे. या नाकाबंदी दरम्यान गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतूक, कत्तलीसाठी किंवा इतर कारणांसाठी होणारी हालचाल रोखण्यासाठी विशेष दक्षता घेतली जाणार आहे. मोटार परिवहन विभाग, पशुवैद्यकीय विभाग तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेही यामध्ये समन्वयाने सहकार्य घेतले जाणार आहे.

यावेळी लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''लातूर जिल्ह्याला सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि शांततेची समृद्ध परंपरा लाभली आहे. सर्व समाजघटकांनी संयमाने व परस्पर सहकार्याने वागून कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. सण उत्सव हे एकोपा व सामाजिक ऐक्याचे प्रतीक असून ते कायद्याच्या चौकटीत शांततेत पार पडणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

सदर बैठकीस कुरेशी समाजाचे पदाधिकारी, मुस्लिम समाजाचे धर्मगुरू, हिंदू संघटनांचे प्रतिनिधी, गोरक्षक संघटनांचे पदाधिकारी, लातूर जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभागाचे अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी सर्व समाजघटकांनी परस्पर समन्वय, शांतता व कायद्याचे पालन राखून ईद-उल-अजहा सण निर्विघ्नपणे व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करण्याचे आश्वासन दिले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.